
12-03-2025-Dai-01new_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/11/2025 10:44 PM Page 1



चोराव-रायबंदर रो-रो फेरी सेवेसाठी आणखी दोन महिने प्रतीक्षा » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



फोंड्यात कविवर्य कुसुमाग्रज यांच्या कवितांना उजाळा » पान ४ वर

वेर्णा, बुधवार, १२ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 189 | Verna, | facebook.com/dainikherald | Wednesday 12 March 2025 | Pages 4 | ₹ 4

# दोन ठिकाणी होणार देव खापरेश्वराची स्थापना

## मूळ ठिकाणी होणार खापरेश्वराची घुमटी | सुकूरला होणार मंदिर

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ११ :भक्तांच्या मागणीप्रमाणे दोन वेगवेगळ्या ठिकाणी देव खापरेश्वराची स्थापना करण्यास सरकार तयार असल्याची माहिती पर्वरीचे आमदार आणि मंत्री रोहन खंवटे यांनी दिली आहे. खापरेश्वर मंदिर पुनर्स्थापनेबाबत दोन गटात सुरू असलेल्या वादावर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी बैठक पार पडली. या बैठकीनंतर खंवटे यांनी ही माहिती दिली आहे. त्यानुसार मूळ खापरेश्वराच्या ठिकाणी १० ते १५ चौरस मीटर जागेत घुमटी आकारून खापरेश्वरची स्थापना केली जाणार आहे, तसेच सुकूर येथील अल्कोन शो रुमच्या जवळ देखील देव खापरेश्वर मंदिराची बांधणी करून मूर्तीची स्थापना केली जाईल, असे मंत्री खंवटे यांनी स्पष्ट केले आहे .**

पर्वरी फ्लायओव्हरच्या मार्गात येणारे ऐतिहासिक वडाचे झाड हटवण्यास न्यायालयाने परवानगी दिल्यानंतर त्या ठिकाणी वसवण्यात आलेल्या खापरेश्वर मंदिराच्या हटवण्यावरून बराच वाद झाला. राजकीय पक्षांनी सावंत सरकारला हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर खापरेश्वरच्या मंदिराच्या पुनर्निर्माणाची घोषणा मुख्यमंत्र्यांना करावी लागली . मात्र ही घोषणा करताच हे नवे मंदिर कुठे असावे यावरून दोन स्थानिक गटात वाद सुरू झाला. मंत्री खंवटे यांनी दिलेल्या माहितीनुसार तिथे दोन गट आहेत . एका गटाचे म्हणणे आहे की, त्या जुन्या मंदिराच्या ठिकाणी किमान एक घुमटी तरी बांधली गेलीच पाहिजे आणि दुसऱ्या गटाचे म्हणणे आहे की संपूर्ण देवस्थान आणि खापरेश्वरच्या मूर्तीची विधिवत स्थापना झाली पाहिजे. या दोन्ही गटाच्या मागण्यांचा विचार ग्राह्य धरण्याचे मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत ठरले असल्याचे खंवटे म्हणाले. त्यानुसार ज्या मूळ ठिकाणी खापरेश्वरचे मंदिर होते त्याच ठिकाणी १० ते १५ चौरस मीटरच्या जागेत एक घुमटी उभारली जाणार आहे . त्यासाठीची बोलणी ठेकेदारासोबत पूर्ण झालेली आहेत . त्याचबरोबर दुसरीकडे सुकूर येथील अल्कोन शो रुमच्या जवळ निश्चित केलेल्या जागेत दुसऱ्या गटाच्या मागणीप्रमाणे नवे खापरेश्वर मंदिर उभारले जाणार आहे . या मंदिरात देव खापरेश्वरच्या मूर्तीची विधिवत स्थापना केली जाणार आहे , यासाठी सरकार सर्वतोपरी सहकार्य करेल अशी ग्वाही मंत्री खंवटे यांनी दिली आहे. एकाच गावात दोन खापरेश्वर कसे काय असा प्रश्न खंवटे यांना विचारला असता ते म्हणाले की , काहीही असले तरी आम्ही देवाला सीमेबाहेर नेलेले नाही, देव खापरेश्वर त्याच्याच सीमेत राहणार आहे असे म्हणत त्यांनी अधिक काही बोलण्यास नकार दिला जर दोन्ही गटांनी आपसात समझोता करून एक जागा सुचवल्यास त्या ठिकाणी देखील सरकार खापरेश्वर मंदिर बांधून देण्यास तयार असल्याचे मंत्री खंवटे यांनी स्पष्ट केले आहे

पान २ ▶

# पाकमध्ये 'ट्रेन हायजॅक'

▶ **बलुच बंडखोरांकडून ४५० प्रवासी ओलिस, ६ सैनिकांची हत्या**

**कराची, दि. ११ :**

पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील फुटीरतावादी दहशतवाद्यांनी मंगळवारी सुमारे ४५० प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या प्रवासी ट्रेनचे अपहरण करून यावेळी तब्बल ४५० हून अधिक प्रवासांना ओलीस ठेवल्याचे समोर आले आहे. यावेळी बलुच लिबरेशन आर्मीने बोलानमध्ये जाफर एक्सप्रेसचे अपहरण केल्याचा दावा केला जात आहे. यासोबतच, जर त्यांच्याविरुद्ध कोणतीही लष्करी कारवाई सुरू केली तर ते सर्व प्रवाशांना ठार मारण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी झालेल्या चकमकीत पाकिस्तानच्या ६ लष्करी जवानांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. यामुळे पाकिस्तानात मोठी खळबळ उडाली आहे.

बलुच लिबरेशन आर्मीच्या दहशतवाद्यांनी हायजॅक केलेल्या ट्रेनमध्ये पाकिस्तानी लष्कर, पोलीस, दहशतवाद विरोधी दल आणि इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्सचे कर्तव्यावर असलेले कर्मचारी आहेत. हे सगळे सुट्टीसाठी पंजाबला जात होते. ट्रेनमधील सैनिकांनी कोणत्याही प्रकारची कारवाई करण्याचा प्रयत्न केल्यास सगळ्या ओलिसांना मारुन टाकू, अशी थेट धमकी बलुच लिबरेशन आर्मीकडून देण्यात आलेली आहे. दहशतवाद्यांनी पाकिस्तानी लष्कराच्या ६ सैनिकांची हत्या केली आहे. रेल्वे नियंत्रक

पान २ ▶

## निवडक

### केजरीवालांच्या अडचणीत वाढ

**नवी दिल्ली, दि. ११ :** दिल्ली विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक आणि माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. सार्वजनिक निधीच्या गैरवापरप्रकरणी केजरीवालांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्लीतील राऊस अव्हेन्यू न्यायालयाचे पोलिसांना दिले आहेत. सार्वजनिक निधीच्या गैरवापरप्रकरणी केजरीवाल आणि इतरांविरुद्ध एफआयआर नोंदवण्याचे निर्देश राऊस अव्हेन्यू न्यायालयाने दिल्ली पोलिसांना दिले आहेत. या प्रकरणी शिवकुमार सक्सेना यांची याचिका दाखल केली होती. न्यायालयाने ती स्वीकारली. न्यायालयाने दिल्ली पोलिसांना १८ मार्च रोजी या प्रकरणी अहवाल दाखल करण्याचे निर्देशही दिले आहेत.

---

### मार्क कार्नी कॅनडाचे नवे पंतप्रधान

**कॅनडा, दि. ११ :** कॅनडाला मार्क कार्नी यांच्या रूपात लवकरच नवीन पंतप्रधान मिळणार आहे. लिबरल पार्टीच्या निवडणुकीत ५९ वर्षीय कार्नी यांना ८५.९ टक्के मते मिळाली. ते पंतप्रधान म्हणून जस्टिन टडो यांची जागा घेतील. गेल्या काही दिवसांपासून हिंदुस्थानसोबतचे कॅनडाचे संबंध तणावाचे राहिले आहेत. त्यात अमेरिकेबरोबर सध्या सुरू असलेला टॅरीफ वॉर'चा मुद्दा ताजा असतानाच कॅनडाला नवीन पंतप्रधान मिळणार आहे.

# आतिशी यांच्या विधानावर पालेकर यांनी बोलावे : पाटकर

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ११ :** काँग्रेसने गोव्यातील आगामी निवडणुकांमध्ये युतीबाबत स्पष्ट भूमिका घेतली असून, अंतिम निर्णय काँग्रेस हायकमांडच घेईल, असे काँग्रेसचे उपाध्यक्ष सुनील कवठणकर आणि प्रदेशाध्यक्ष अमित पाटकर यांनी स्पष्ट केले आहे.

काँग्रेसचे उपाध्यक्ष सुनील कवठणकर यांनी 'हेराल्ड'ला दिलेल्या प्रतिक्रियेत सांगितले की, युती हा पक्षाच्या धोरणाचा विषय आहे आणि याबाबतचा निर्णय अखिल भारतीय काँग्रेस कमिटी म्हणजेच हायकमांड घेईल. स्थानिक युनिटला तो निर्णय बंधनकारक असेल. निवडणुकीच्या तयारीसाठी योग्यवेळी हायकमांडचा सल्ला घेतला जाईल. दरम्यान, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अमित पाटकर यांनी युतीबाबत चर्चा करणे सध्या अकाली असल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, मला माहीत नाही की आतिशी कोणत्या संदर्भात बोलल्या होत्या. त्या दिल्ली आणि देशाबद्दल बोलत होत्या की केवळ गोव्याबद्दल, हे स्पष्ट नाही. मात्र, निवडणुकीला अद्याप दोन वर्षे शिल्लक असल्यामुळे युतीबाबत चर्चा करणे ही घाईगडबड ठरेल.

पाटकर पुढे म्हणाले, युतीबाबतचा निर्णय योग्यवेळी हायकमांड घेईल आणि मला खात्री आहे की तो योग्य निर्णय असेल. सध्या आमचे मुख्य लक्ष्य राज्यातील सर्व ४० मतदारसंघांमध्ये पक्ष बळकट करणे

पान २ ▶

# गोव्यातील तरुणाची म्यानमारमधून सुटका

▶ **नोकरीच्या बहाण्याने फसवणूक**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

पणजी, दि. ११ : परराष्ट्र मंत्रालयाने म्यानमारमधून सुटका केलेल्या २८३ भारतीय नागरिकांमध्ये एका गोव्यातील तरुणाचा समावेश आहे. थायलंडमध्ये नोकरीच्या आमिषाने फसवून त्याला म्यानमारमध्ये शोषणाच्या परिस्थितीत अडकवण्यात आले होते.

पोलिसांच्या माहितीनुसार, जानेवारी २०२५ मध्ये गोव्यातील एका अभियांत्रिकी पदवीधराला परदेशात नोकरीच्या शोधात असताना इन्स्टाग्रामवर थायलंडमधील कॉल सेंटरच्या नोकरीची जाहिरात दिसली. नोकरीच्या ऑफरमध्ये मोफत निवास, जेवण आणि ६० हजार रुपये मासिक पगाराचे आमिष दाखवण्यात आले. भरती प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन होती आणि उमेदवाराचा एजंटशी थेट संवाद व्हॉट्सअॅपवर होत होता. प्रवासाच्या सर्व व्यवस्था एजंटनेच केल्या, ज्यामध्ये बँकॉकला जाण्यासाठी फ्लाइटचे बुकिंगही समाविष्ट होते.

१४ जानेवारी २०२५ रोजी पर्यटन व्हिसावर थायलंडमध्ये पोहोचल्यानंतर सुरुवातीला त्याला माई सोटमधील एका रिसॉर्टमध्ये ठेवण्यात आले. मात्र, दुसऱ्याच दिवशी त्याला गुप्तपणे नदी ओलांडून म्यानमारमध्ये नेण्यात आले. तेथे एका सुरक्षित कंपाऊंडमध्ये कडक पहाऱ्यात बंदिस्त करण्यात आले. हालचालीवर नियंत्रण ठेवण्यात आले आणि स्वतंत्र हालचालीसाठी कोणतेही साधन उपलब्ध नव्हते. यानंतर, त्याला शोषणाच्या परिस्थितीत आठवड्यातील कोणतीही सुट्टी न देता दररोज १४ तास काम करायला लावले. एका परदेशी नागरिकाच्या नेतृत्वाखालील टीममध्ये त्याला नियुक्त करण्यात आले. त्याची भूमिका संभाव्य बळींना मुख्यतः अमेरिकन नागरिकांना फसवणूक करणारे संदेश पाठवण्याची होती. प्रतिसाद मिळाल्यास ती माहिती वरिष्ठांकडे दिली जात असे, जे गुंतवणूक फसवणूक आणि हनी ट्रॅपिंगसह विविध फसव्या यंत्रणांमध्ये सामील होते.

परराष्ट्र मंत्रालयाच्या मदतीने अखेर त्याची सुटका करण्यात आली. सायबर क्राइम एसपी राहुल गुप्ता यांनी नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. परदेशातील नोकऱ्या मिळवण्यासाठी केवळ परराष्ट्र मंत्रालयाच्या नोंदणीकृत एजंट्सद्वारेच अर्ज करावेत . इतर

पान २ ▶




Hyundai EXTER आणि Grand i10 NIOS मध्ये Hy - CNG Duo उपलब्ध. स्पेसही. मायलेजही.
##डिपॉझिटचे वैध प्रमाणपत्र दाखवल्यास अतिरिक्त स्क्रॅपेज बोनस उपलब्ध. #CSD आणि KPKB ग्राहकांसाठी अतिरिक्त लाभ.

HYUNDAI

Hyundai Cl!ck to Buy Scan here | 3 YEAR Unlimited** Kilometer Warranty | UPTO 7 YEARS Extended Warranty^ | 3 YEARS Road Side Assistance (RSA)*** | UPTO 5 YEARS Shield of Trust Running Repair Package~ | UPTO 5 YEARS Shield of Trust Super Maintenance Package~ | Hy - CNG Duo

**For Information Contact:** Toll Free: 1800114645 **Porvorim:** Alcon Hyundai, Ph: 7030938989 **Margao:** Alcon Hyundai, Ph: 7030938989 **Verna:** Goa Hyundai, Ph: 6699999, 9822131489 **Tivim:** Goa Hyundai, Ph: 8390965558 **Ponda:** Goa Hyundai, Ph: 2313375, 9822588861

my Hyundai app | Hyundai Promise Certified Pre-Owned Car | Scan to chat with us or give a missed call at 9555295868

*Terms & Conditions apply. Benefits mentioned include applicable cash, exchange and corporate benefits. Benefits may vary with variants. **3-year warranty or upto 100 000 km whichever is earlier for Grand i10 NIOS, AURA, i20 & i20 N Line. 3-year unlimited km warranty is applicable for EXTER, VENUE, VENUE N Line, CRETA, CRETA N Line, CRETA Electric, ALCAZAR, TUCSON, VERNA and IONIQ 5. ^Upto 7 Years extended warranty is available for Grand i10 NIOS, i20, i20 N Line, AURA, VERNA, EXTER, VENUE, VENUE N Line, CRETA, CRETA N Line, CRETA Electric, ALCAZAR & TUCSON in all variants (Petrol/Diesel/CNG) and subject to payment. ***3 years Roadside Assistance (with taxi support & introduction of 10 year retail program). ~For detailed T&C of RSA, Shield of Trust & Super, kindly visit Hyundai India website. This advertisement and car shown here is for creative representation purposes only and the depictions are for illustrative purposes. Features and specifications shown may vary or may not be a part of standard fitment and are subject to change without prior notice. Hyundai Motor India Limited reserves the right to change specifications, colour, equipment and schemes at any time without prior notice. The black shade on glasses are due to lighting effect. Size and colour may appear to vary due to lighting and position effect. Extended Warranty and Shield of Trust & Super are on payable basis. For more details on warranty, please refer owners' manual, ##Scrappage bonus is applicable on select models subject to receipt of valid Certificate of Deposit issued by Govt. approved & operational vehicle scrappage center. #CSD: Canteen Stores Department, KPKB: Kendriya Police Kalyan Bhandar. INNOCEAN-012/25 MAR